# मुख्यमंत्र्यांहस्ते डिजीटल मधुमेह रजिस्ट्रीचा शुभारंभ

ता. 09 ऑगस्ट 2019
18 श्रावण 1941

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी गोवा देशात डिजीटल मधुमेह रजिस्ट्री तयार करण्यासाठी ओळखले जाईल असे सांगितले. नोवो नॉर्डीक्स एज्युकेशन फाऊंडेशनच्या भागीदारीने देशाच्या पहिल्या डिजीटल मधुमेह रजिस्ट्रीच्या शुभारंभ कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते.

पुढे बोलताना मुख्यमंत्र्यांनी आरोग्य मंत्र्यांच्या प्रयत्नांची प्रशंसा केली तसेच डिजीटल मधुमेह रजिस्ट्रीचा शुभारंभ करण्यासाठी पुढाकार घेतलेल्या डॉक्टरांचीही त्यांनी प्रशंसा केली. राज्यात मधुमेहाचे प्रमाण कमी करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बोलताना आरोग्यमंत्री श्री. विश्वजीत राणे यांनी मधुमेहाचे प्रमाण गोव्यात वाढत असल्याचे सांगितले. मधुमेह हा रोग सायलंट किलर आहे. वाढत्या मधुमेहावर आळाबंद घालण्यासाठी आणि या समस्येपासून लोकांना दूर ठेवण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल श्री. राणे यांनी मुख्यमंत्र्यांची तसेच संबंधित व्यक्तींच्या भुमिकेची प्रशंसा केली. मधुमेहावरील प्रत्येक विषयांवर कार्य करण्याचा सल्ला त्यांनी दिला. योग्य आहार, व्यायाम आणि वेळेत उपचार घेण्याची गरज त्यांनी यावेळी प्रतिपादली. त्यामुळे मधुमेह नियंत्रणात आणण्यास मदत होईल असे ते म्हणाले.

क्रिकेटपटू आणि नोवो नॉर्डीक्सचे ब्रॅड ॲम्बेसडर श्री. अनिल कुंकळे यांनी आपल्या भाषणात गोव्यातील लोकांसाठी डिजीटील मधुमेह रजिस्ट्री तयार करून त्याच्या शुभारंभात भाग घेणे ही आनंदाची बाब असल्याचे सांगून त्यांनी समाधान व्यक्त केले. लोकांच्या कल्याणासाठी अशाप्रकारचे पाऊल उचलल्याबद्दल त्यांनी सरकारची प्रशंसा केली. बदलत्या जीवन पध्दतीशी मधुमेहाचे बळकट संबंध असल्याचे ते म्हणाले. त्यांनी लोकांना योग्य सल्ला आणि मार्गदर्शन तसेच आरोग्याच्या टीपस् घेण्याचे सांगितले आणि प्रतिबंदात्मक उपाय घेण्याचे ते म्हणाले.

आरोग्स सेवा संचालक डॉ. जुझे डिसा यांनी पाहुण्याचे स्वागत केले.

एनएनईएफचे व्यवस्थापकीय ट्रस्टी श्री. मेलवीन डिसौझा यांनी मधुमेहासंबंधी माहिती दिली.

मधुमेहग्रस्त श्रीमती फातिमा डिसौझा आणि श्री. गुरूनाथ नाईक यांनी यावेळी आपले विचार मांडले.

आरोग्य सचिव श्री. अशोक कुमार, जीएमसीचे डीन श्री. शिवानंद बांदेकर, डॉ. अंकुश देसाई, डॉ. एडविन गोम्स, श्रीमती ज्योती सरदेसाई व इतर यावेळी उपस्थित होते.

कुमारी मेखला भट यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

मा/वाप/एमएस/जॉआ/रना/प्रधु/2019/454

DIRECTORATE OF INFORMATION AND PUBLICITY.
THIRD FLOOR,UDYOG BHAVAN,
NEAR AZAD MAIDAN, PANAJI GOA